।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि १७ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३४ वा


# लाडकी बहिण कोण? सासू की सून ! एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक नावामुळे कोणाचे नाव अपात्र करायचे व पात्र ठरवायचे याबाबत मोठा पेच

## सांगोला तालुक्यातील ७ हजार लाडक्या बहिणींची पडताळणी

सांगोला :लाडकी बहीण योजनेअंतर्गत सांगोला तालुक्यात ८४ हजार पैकी ७ हजार महिलांची बारकाईने पडताळणी केली जात आहे. या पडताळणीमध्ये वयाची अट पूर्ण न करणाऱ्या आणि एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त महिलांनी अर्ज केल्याचे आढळून आले आहे. यामध्ये लाडकी कोण ? सासू की सून ? हे ठरविण्यामध्ये अंगणवाडी सेविकांची मोठी तारांबळ उडत आहे.




निवडणुकीच्या काळात सुरू झालेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अत्यंत लोकप्रिय ठरली आहे. मात्र, निवडणूक संपल्यानंतर या योजनेच्या निकषांमध्ये सरकारने टप्प्याटप्प्याने मोठा बदल केला आणि अत्यंत कडक पडताळणी सुरु केली. या पडताळणीमध्ये सांगोला तालुक्यातील शेकडो – हजारो महिलांना अपात्र ठरवण्यातआले आहे. या निर्णयामुळे महिलांमध्ये सरकारविरोधी नाराजी वाढली आहे. शासनाकडून बाल विकास प्रकल्प विभागाच्या मदतीने ही पडताळणी सध्या सुरू असून अर्जाची बारकाईने तपासणी केली जात आहे. सांगोला तालुक्यातील ३८९ अंगणवाडी शाळेतील अंगणवाडी सेविका व त्यावर नियंत्रण ठवण्यासाठी सुपरवायझर झपाट्याने कामाला लागले आहेत. यामध्ये वयाची मर्यादा आणि एका कुटुंबात दोन महिलांना लाभ मिळतो.

यासह पडताळणीमध्ये चारचाकी वाहन असलेल्या महिलांची यादी तपासण्यात येत आहे. तसेच संजय गांधी निराधार योजना, नमो शेतकरी महासन्मान योजना आणि इतर वैयक्तिक लाभाच्या योजना घेणाऱ्या महिलांची देखील छाननी करण्यात आली आहे. सरकारी नोकरीत असलेल्या महिलाही या तपासणीत समाविष्ट आहेत. माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार वयाच्या निकषांची आणि एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक लाभार्थ्यांची तपासणी सध्या सुरू आहे. सदर तपासणी दरम्यान एकाच कुटुंबात अनेक महिलांनी लाभ घेतल्याची माहिती समोर येत असून, यामध्ये कोणाचे नाव अपात्र करायचे व कोणाचे नाव पात्र ठरवायचे याबाबत मोठा पेच निर्माण झाला आहे.

यामध्ये लाडकी कोण, सासू की सून ? , एकाच कुटुंबातील पात्र ठरवण्यावरून अंगणवाडी सेविकांची तारांबळ उडत आहे.

## खड्ड्यात पडून मृत्यू झाले प्रकरणी रस्ते विभागावर सदोष मनुष्यवध गुन्हा दाखल करण्याची प्रफुल्ल कदम यांची प्रशासनाकडे मागणी

### कडलास येथे अपघात झालेल्या खड्ड्यातच करणार उपोषण

सांगोला ते कडलास या रस्त्यावर कडलास जवळील लिगाडे वस्ती येथे रस्त्यावरील खड्ड्यामुळे आणि रस्ते विभागाच्या बेजबाबदारपणामुळे अपघात होऊन अंकुश जगताप या व्यक्तीचा परवा दुर्दैव मृत्यू झाल्याने आणि त्यानंतर ही त्या ठिकाणी अनेक अपघात झाल्याने सदर प्रकरणी रस्ते विभागाशी निगडित सर्व जबाबदार दोषींवर तत्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तत्काळ कारवाई करावी अन्यथा त्याच खड्ड्यात बसून मी उपोषण करणार असल्याचा इशारा किसान आर्मी व वॉटर आर्मीची नेते प्रफुल्ल कदम यांनी शासनाला दिला आहे.

दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी कडलास गावचा रहिवासी अंकुश वसंत जगताप(वय ४०) हा सांगोल्याहून त्याच्या घरी कडलास या गावाकडे मोटरसायकलने जात असताना लिगाडे वस्ती जवळ रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामध्ये पडला. त्यामुळे त्याच्या डोक्याला जबर मार लागून त्याचा हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना परवा दिवशी गुरुवारी दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. सदर मृत्यू केवळ रस्त्याच्या वाईट अवस्थेमुळे, खड्ड्यामुळे झाला आहे. सदर रस्त्याची अवस्था केल्या अनेक दिवसांपासून अत्यंत वाईट होती. अंकुश जगताप यांच्या मृत्यूनंतर आजही त्या ठिकाणी तशीच अवस्था आहे. अंकुश जगताप यांच्या अपघातापूर्वी आणि अपघातानंतर त्या ठिकाणी आणखी सात आठ गंभीर अपघात झालेले आहेत. संबंधित रस्ते विभागाला या अपघाताची काहीही देणे घेणे नाही. त्यांनी नियमानुसार साधे सूचना फलकही त्या ठिकाणी लावलेले नाहीत.अंकुश जगताप या तरुण मुलाचा मृत्यू केवळ आणि केवळ कडलास रस्त्यावरील खड्ड्यामुळे झाला आहे. यास रस्ते विभागाचे दुर्लक्ष आणि बेजबाबदारपणा उघडपणे जबाबदार आहे.

## सांगोला शहरात प्रशासनाच्या वतीने हर घर तिरंगा बाईक रॅली सोहळा संपन्न

सांगोला : सांगोला तालुक्यातील प्रशासकीय विभागाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सांगोला तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन सांगोला यांच्या वतीने सांगोला शहरात वंदे मातरम चौक– नेहरू चौक– नगरपालिका– फुले चौक– वाढेगाव नाका –डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक या ठिकाणी सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने तहसीलदार संतोष कणसे,पोलीस निरीक्षक विनोद घुगे,सहाय्यक विकास गट विकास अधिकारी फुले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मोटरसायकलला तिरंगा झेंडा लावून हर घर तिरंगा बाईक रॅली कचेरी येथून शुभारंभ करण्यात आला.



प्रभात फेरीला नागरिकांचा, कर्मचाऱ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रत्येक कर्मचारी–अधिकारी प्रभात फेरीत सहभागी होत गेल्याने रॅलीतील उत्साह वाढला. पावसातही हातात तिरंगा घेऊन नागरिक भारतमातेचा जयघोष करीत होते.या बाईक रॅलीमध्ये वंदे मातरम्, वंदे मातरम' भारत माता की जय, हर घर तिरंगा' अशा घोषणांमधून देशभक्तीची भावना प्रत्येक कर्मचाऱ्यातून दिसून येत होती.यावेळी तहसीलदार संतोष कणसे म्हणाले की, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने प्रशासनाच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे सांगोला शहरातून आयोजन केले होते.

## सांगोला नगरपरिषदेकडून आयोजित संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा उत्साहात संपन्न



सांगोला : दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सांगोला नगरपरिषदेच्या वतीने आयोजित संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची ७५० वी जयंती निमित्त आयोजित पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याला सांगोला परिसरातील नागरीक, वारकरी व भक्तांनी हजेरी लावली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची सांगोला शहरात टाळ–मृदंगाच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जयघोषात उत्साहपूर्ण मिरवणूक काढली.

पालखीची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी स्थानिक विठ्ठल भजनी मंडळ (पुरुष) आणि रुद्र महिला भजनी मंडळ यांनी सादर केलेल्या दिंड्यांनी सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या भक्तिमय भजनांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.सोहळ्यादरम्यान संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनावर आधारित भजन, भक्तीगीते आणि गोल रिंगण यांसारखे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सर्वांच्या सहकार्यामुळे हा उत्सव यशस्वी झाला, असे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांनी सांगितले.

# माणसाने माणसाशी सौख्याने वागावे !




आपल्या प्रिय भारत देशाला इंग्रजी राजवटीच्या पारतंत्र्यातून १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला पवित्रतेचे श्रेय मिळाले. ती आजपावेतो आपण जोपासुन इतिहासातील पवित्र घटनांची स्मृती कायम ठेवूनच आज आपण देशात ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिना निमित्त आम्ही भारतीय आहोत याबाबत आम्हाला आत्मविश्वासच नाहीतर अभिमान आहेच. भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात आम्ही भारतीय आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तो टिकवून ठेवण्याची गरज आज भासू लागली आहे, कारण देश ढासळू पाहत आहे.

भारतीय स्वातंत्र्याची मुर्हुतमेढ १८५७ मध्येच रोवल्या गेलेली होती. या मुहुर्तमेढीवर भारतीय तिरंगा फडकविण्यास ९० वर्षाचा कालावधी लागला. या कालावधीत ही मुर्हुतमेढ अधिक सक्षम करण्यासाठी थोर क्रांतीकारकांचे बलिदान तसेच थोर नेत्यांची विचारसरणी व परिकाष्ठा लाभलेली आहे. तसेच या थोर नेत्यांची दिर्घ परंपरा सुध्दा या देशाच्या अस्तित्वाची साक्ष देते. या स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनी अशा थोर नेत्यांचे स्मरण करुन त्यांच्या प्रती नतमस्तक होणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. या शुभदिनी आम्ही शपथपुर्वक संकल्प केला पाहिजे की, आमच्या देशाच्या स्वातंत्र्याची सुरक्षा करणे हे आमचे एकमेव ध्येय आहे व त्याकरिता आम्हाला निरंतर जागरुक राहण्याची गरज आहे. आम्हा भारतीयांना मान नाही पण विदेशी माणसांना आमुच्या देशात फार मानानं सन्मानानी वागवलं जातं, ठिक आहे. तरी आम्ही ही शेवटी माणसं आहोत, याची जाणीव देखील येथील व्यवस्थेने ठेवावी. माणसा-माणसांत वितंडवाद होता कामा नये, ही खबरदारी शासनाची आहे.

भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणुन त्यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले 'जन गण मन' हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले. भारतीय संविधानामुळेच देशाची प्रगत राष्ट्रमध्ये मान उंचावत आहे. तेव्हा संविधानाचा अवमान होता कामा नये, याची दक्षता सरकारने काटेकोरपणे घेण्याची गरज आहे, कारण सध्या तरी संविधानाचा अवमान होत असल्याच्या घटना देशात घडत असतांना शासन हातवारे करीत आहे, असं होता कामा नये. जर असं घडलंच तर त्या व्यक्तिचं नागरिकत्व खलास करण्याची तरतूद करुन त्याला दंडीत केले पाहिजे.

हा ७८ वा स्वातंत्रदिन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव्या भारतास घटना समर्पीत केली, तो आम्हाला भारतीय असण्याचा अभिमान आहे. पं. जवाहरलाल नेहरूंनी आराम हराम आहे हा मंत्र दिला, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवीली तर लाल बहादुर शास्त्रींनी जयजवान, जयकिसान चा नारा देत ताश्कंद करार केला. प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांनी राजे व महाराजे यांचे तनखे बंद केले, बँकाचे राष्ट्रीयकरण केले. तसेच गरीबी हटाव चा नारा दिला २० कलमी कार्यक्रम देशभर लागू करुन देशाला, अर्थव्यवस्थेला नविन आयाम देवून या देशात सामाजिक क्रांती घडविली आणि युवा नेते राजीव गांधी यांनी २१ व्या शतकातील माहिती आणि तंत्रज्ञान असा भारत निर्माण करण्यास समर्थपणे पावले उचललीत. १९४७ साली राजकिय स्वातंत्र्य मिळाले मात्र सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय खऱ्या अर्थाने सुराज्य निर्माण करता येणे शक्य नव्हते. हा धागा पकडून विकासाच्या अनेक योजना जाणीवपूर्वक राबविण्यात आल्या. समाजातील तळागाळातील लोकांची प्रगती व विकास साधणे हा या मागील उद्देश होता. पण तो ही आजवर साध्य झालेला दिसत नाही, ही शोकांतिका म्हणावी लागेल.

भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. २६ जानेवारी १९५० रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो) भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते.

परंतू अशा विपरीत आर्थिक कालखंडात सुध्दा भारत देश वेगळा पर्याय ठरु शकतो, असा एकमत प्रवाह होता. योग्य वैधानिक व कर प्रणाली तसेच योग्य आर्थिक वातावरण उपलब्ध करुन दिल्यास भारत आणि भारतीय व्यवसाय जगातील उत्तमांपैकी एक होऊ शकतो आणि जग भारतात येण्याची इच्छा व्यक्त करेल, असा युक्तिवाद सुध्दा या विचारसरणीने केलेलाआहे. हे सर्व देशाचे माजी पंतप्रधान मा.डॉ. मनमोहन सिंग यांच्याआर्थिक निती मुळे घडू शकले, ज्याचा पाया या देशाचे दिवगंत पंतप्रधान युवा नेते राजीव गांधी यांनी रचला होता. ही वस्तूस्थिती नाकारता येणार नाही. पण याचा बाऊ केला जात आहे हे देशहिताच्या विरुध्द आहे, खऱ्याला खरं म्हटलं पाहिजे.

आज ग्रामीण भारताला एका मोठ्या आर्थिक तथा सामाजिक बदलाची गरज आहे. ज्यात शिक्षण, सुदृढ आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण विषयक, आर्थिक तसेच सामाजिक दर्जा सुधारणे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील उत्पादकता तसेच जीवनस्तर उंचावण्यास मदत होईल. सरकारने हे धोरण सक्तिने अंमलात आणले पाहिजे, तेव्हाच जीवनस्तर उंचावेल.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात. जन गण मन हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते.

इंग्रजांचा कावेबाजपणा ओळखणाऱ्या काहींनी त्यांच्या विरुध्द शस्त्र उगारले. १८५७ मधले स्वातंत्र्यसमर तात्या टोपे, झाशीची राणी, नानासाहेब पेशवे यांनी गाजवले. पुढे सशस्त्र उठाव करुन वासुदेव बळवंत फडके, क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू इत्यादींनी आपला निषेध शस्त्रांच्या उपयोगाने नोंदविला. काहींनी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या केली, सावरकर, धिंग्रा इत्यादींनी तसेच प्रयत्न केले. स्वातंत्र्यासाठी जसे माणसं शहीद झाली तशी वंशावरही संकटे आली. लोकजागृती झाली पण दडपली गेली रानडे, टिळक, गोखले, आगरकर यांनी लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य वापरुन इंग्रजांकडून होणारा अन्याय आणि जुलूम यांची जनतेला जाणीव करुन दिली. भारतीय समाजाला आपली स्थिती सुधारण्याची प्रेरणा दिली. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रयत्नाने जातीय भेदाभेद किती वाईट आणि त्यामुळे समाज कसा दुर्बल होतो हे लोकांच्या निर्दशनास आले.

बिझ्नेस कन्सर्न इन इंडिया या पाक्षिकामध्ये आम्हाला आमच्या देशाच्या इतिहासाचा थोर अभिमान आहे. आम्ही अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत स्वातंत्र्याची वाटचाल सुरु केली, परंतू इतर देशाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय व्यापार हाच आमच्याआजच्या भौतिक बदलास व आर्थिक स्वातंत्र्यास कारणीभुत असल्याचे आमचे ठाम मत आहे. आमच्या देशाच्या मागील २० वर्षाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास, आम्ही आमचा जलद आर्थीक विकासास या नविन शतकाच्या सुरुवाती पासूनच सुरुवात केल्याचे स्पष्ट जाणवते, पण तिथेही ठोस अशी पाऊले उचललीत नाही.

बहुसंख्य तरुण भारतीयांच्या मते जुनी आर्थिक विषमता कालबाहय झालेली असून येणाऱ्या भविष्यात आम्हाला मोठ्या सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना पार करावयाचे आहे. परंतू हे करतांना आम्हाला काही संकटांना समोरे जावेच लागेल, कारण पुढील १० वर्षेही आताच्या काळापेक्षा सर्वदृष्टीने वेगळे असतील आणि आम्हाला या काळात यशस्वी होण्याकरीता आयुष्याच्या सर्वच क्षेत्रात व्यापार, खेळ, आंतरराष्ट्रीय घडामोडीवर मात करावी लागेल. त्यासाठी ठाम निर्णय घेण्याची गरज आहे, तोंडदेखलेपणा नको. ते आज देशात घडत आहे, हे थांबलं पाहिजे.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आज ७७ वर्ष पूर्ण होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची अन् आनंदाची बाब आहे. स्वातंत्र्य दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वजण कटिबध्द होऊ या. तेव्हाच देश अराजकतेकडे जाणार नाही आणि लोकशाही जिवंत राहिल, याचं भान असणं गरजेचं आहे. भारत माझा देश आहे आणि मी त्याचा मालक आहे हे आमच्या बापाने आम्हाला सांगितले आहे कोणाच्या सांगण्यावरुन आम्हाला आमची देशभक्ति सिध्द करुन दाखवायची गरज नाही. आमची देशभक्ति आमच्या रक्तात भिनलेली आहे आणि ती डोळस आहे. स्वातंत्र्य लढ्यात काडीचं ही योगदान नसणाऱ्या कुत्र्यांनी आम्हाला देशभक्ति शिकवू नये. देश हा माणसांनी निर्माण होतो म्हणुन देशातला प्रत्येक माणुस हा सुरक्षित असणं म्हणजे देश सुजलाम सुफलाम असणं होय! म्हणूनच माणसांनी माणसाशी सौख्याने वागावे. ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा! ****

-प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## घोंगडे परिवाराने जपले मानवतेचे ऋणानुबंध

### सांगोला विद्यामंदिरमध्ये गरीब विद्यार्थ्यांसाठी वही वाटप संपन्न



सांगोला : सांगोला शहरातील ज्येष्ठ विधीज्ञ उदयबापू घोंगडे व प्रतिष्ठित व्यापारी आनंद काका घोंगडे यांच्यावतीने सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना कै. प्रणव घोंगडे यांचे स्मरणार्थ वही वाटप करण्यात आले. कै.प्रणव याच्या स्मृती प्रित्यर्थ गरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत शैक्षणिक सहाय्य केल्याबद्दल प्राचार्य अमोल गायकवाड यांनी घोंगडे परिवाराचे आभार व्यक्त केले.

यावेळी सुमारे ५०० विद्यार्थ्यांना वह्या वाटण्यात आल्या. याप्रसंगी उद्योगपती अजिंक्य घोंगडे यांचेसह सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे व नरेंद्र होनराव उपस्थित होते.

## फॅबटेक मधील अजय बिले यांची ईगल इन्फॉर्मेशन सिस्टीम्स प्रा.लि.कंपनीत निवड



सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेतलेले कुमार अजय राजाराम बिले यांची मुंबई येथील ईगल इन्फॉर्मेशन सिस्टीम्स प्रा.लि. कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली असल्याची माहिती उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी दिली.

सन २००८ मध्ये नोंदणी केलेल्या ईगल इन्फॉर्मेशन सिस्टीम्स प्रा.लि. कंपनी हि जागतिक आयटी आणि बीपीओ पुरवठादार कंपनी आहे. उद्योगांमध्ये डिजिटल परिवर्तनास गतिशील बनविण्यासाठी ईगल इन्फॉर्मेशन सिस्टीम्स प्रा.लि. कंपनी मदत करते. अशा या कंपनीत फॅबटेक कॉलेज मधील कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनिअरिंग मध्ये शिक्षण घेतलेले पाचेगाव (बुद्रुक) ता. सांगोला येथील अजय राजाराम बिले यांची मुंबई येथील ईगल इन्फॉर्मेशन सिस्टीम्स प्रा.लि. कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली आहे. कंपनीकडून वार्षिक ३.२६ लाख पॅकेज मिळाले आहे.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-३८ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोल्यामध्ये प्रथमच महात्मा फुले जन-आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन-आरोग्य योजनेअंतर्गत डॉ.राजेंद्र जानकर यांच्या श्रीनंद चिल्ड्रन हॉस्पिटल मध्ये एकाच वेळेस ५१ बालकांवर मोफत उपचार



सांगोला : डॉ.राजु जानकर यांच्या श्रीनंद चिल्ड्रन हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जन–आरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत एक आगळा–वेगळा कार्यक्रम म्हणजे एकाच वेळी ५१ बालकावर वेगवेगळ्या आजारासाठी ऍडमिट असल्यामुळे योजनेतील बालकांना व नातेवाईकांना भेट देण्यासाठी डॉ. निकिताताई देशमुख यांनी श्रीनंद हॉस्पिटला भेट दिली व ऍडमिट पेशंटची पाहणी केली यामध्ये (झखउण, छखउण, थअठऊ) च्या पेशंटच्या नातेवाईकांशी संवाद साधला व हॉस्पिटलच्या सर्व सोयी– सुविधांची पाहणी केली.

मार्गदर्शन करताना डॉ. निकिताताई म्हणाल्या की सांगोल्यासारख्या ग्रामीण भागामध्ये नवजात बालकांना मेंदूरोग तज्ञ, हृदयरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, ऑपरेशनच्या सर्व सोयी इत्यादी सुपरस्पेशालिटी उपलब्ध करून रुग्णांना एकाच ठिकाणी सर्व उपचार मिळण्याची सोय डॉ. जानकर सर यांनी करून दिले आहे व योजनेमध्ये कमी दिवसाचे, कमी वजनाचे व जन्मजात सर्व बाळांना मोठी व सुसज्ज सोय करून ठेवले आहे त्यासाठी गरीब व गरजू पेशंटने श्रीनंद हॉस्पिटलमध्ये तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे याची माहिती दिली तसेच श्रीनंद हॉस्पिटल येथे २०२० पासून आज पर्यंत १९५५ बालकांना मोफत औषध उपचार शस्त्रक्रिया झाल्याची माहिती दिली तसेच त्यांनी उपस्थित नातेवाईकांना व नागरिकांना आयुष्यमान कार्ड (गोल्डन कार्ड) काढून घेण्याची विनंती केली व प्रत्येकाने आपले रेशन कार्ड ऑनलाइन काढून घ्यावे असे आवाहन केले. तसेच डॉ.जानकर सर यांनी २१ मोफत योजनेचा लाभ घ्यावा तसेच २१ वर्ष बाळांची सेवा करणारे देवदूत म्हणजे डॉक्टर जानकर सर असे त्यांनी कौतुक केले व लहान बालकांच्या हस्ते केक कापून आनंद साजरा करण्यात आला.

महात्मा ज्योतिराव फुले जन–आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन–आरोग्य योजनेतुन १३५६ आजारावरती कोणकोणत्या हॉस्पिटलमध्ये, कोणत्या आजारावर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात याची माहिती सोलापूर जिल्हा समन्वयक नागेश बनसोडे यांनी दिली वर्ष लहान बालकांचे तपासणी व उपचार अनुभव सांगितले योजनेअंतर्गत लहान बाळांना, गरजूंना सर्वतोपरी मदत करत आहे व सांगोल्या सारख्या शहरात १० वर्षापासून मेंदू रोग तज्ञ, हृदयरोग तज्ञ नेत्ररोग तज्ञ लहान मुलांचे ऑपरेशन ची सोय अशा सुपर स्पेशालिटी सेवा सांगोला भागात दिली आहे याचा फायदा सांगोला भागातील पेशंट न होत आहे उपलब्ध करून पेशंटला सेवा देत आहे तसेच हृदयाच्या संबंधित २ऊइको उपलब्ध आहेत व सर्व प्रकारच्या ऑपरेशन सुविधा उपलब्ध आहेत तरी पेशंटने हॉस्पिटल मध्ये या योजनेचा लाभ घ्यावा असे सांगितले.

कार्यक्रमासाठी डॉ.निकिताताई बाबासाहेब देशमुख, डॉ.राजेंद्र जानकर, डॉ.अनिता जानकर, श्री.नागेश बनसोडे (जिल्हा समन्वयक महात्मा फुले जन आरोग्य योजना सोलापूर) आरोग्यमित्र – पूजा शेळके, सुभाष बनसोडे, स्वप्निल बाबर, गौरी चंदनशिवे, आसिफ पठाण, तसेच चेतन माने, अरुण कोळेकर, विजय मोरे, विकास शिंदे, अमर हिंगमिरे, शितल भोसले व सर्व स्टाफ, व पेशंटचे नातेवाईक यांचे उपस्थिती होती.

# जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत कृषी औजारे व साहित्याची लॉटरी सोडत संपन्न


सोलापूर : जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत सन २०२५–२६ जिल्हा परिषद सेस योजने अंतर्गत जिल्हयातील शेतक–यांकरीता शेतीपुरक औजारे व साहित्य वाटपाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे अध्यक्षतेखाली लॉटरी सोडत संपन्न झाली.

यावेळी त्यांनी पात्र लाभार्थ्यांनी वेळेत औजारे खरेदी करण्याचे आवाहन केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचे उपस्थितीमध्ये लक्षांकानुसार लॉटरी (सोडत) जि. प. प्राथमिक शाळा नेहरूनगर, उत्तर सोलापूर या शाळेतील शाळकरी मुलांकडून लाभार्थ्यांची लॉटरी (सोडत) काढण्यात आली. सोडतीत निवड झालेल्या लाभार्थी यांना या आर्थिक वर्षामध्ये विहित खरेदी प्रक्रिया पूर्ण केले नंतरच सदर योजनेचा लाभ थेट पद्धतीने देय राहणार आहे. सर्व सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी पंचायत समिती स्तरावर क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय साधुन वेळेत औजारे खरेदी करणेची दक्षता घेण्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी केले आहे.

यावेळी कृषि विभागाचे हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी राजाराम भोंग, गट विकास अधिकारी पंचायत समिती उत्तर सोलापूर, सागर बारवकर, जिल्हा कृषी अधिकारी भारत कदम, जिल्हा कृषी अधिकारी अजय वगरे, मोहिम अधिकारी महेश पाटील, सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद सोलापूर, महा. प्रशासन अधिकारी सुर्यकांत मोहिते, राजश्री कांगरे, लता बनसोडे व जिल्हयातील शेतकरी लाभार्थी, तालुक्यातील कृषि अधिकारी, विस्तार अधिकारी, कृषि यांचे उपस्थिती होती. औजारासाठी तालुकानिहाय एकुण उदिष्ट २४५९ असुन त्याकरीता २१४४१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थीतीमध्ये सुरवातीला उत्तर पंचायत समिती कडील लाभार्थ्यांची सोडत शाळकरी मुलांकडुन काढणेत आली.

प्राप्त अर्जाची छाननी तालुका पातळीवर करणेत येऊन पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जिल्हा परिषदेकडे सादर करणेत आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने पिकसंरक्षण औजारे/उपकरणे (श्रो पिस्टनस्प्रे पंप, पॉवर स्प्रेपंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रश कटर, सोलार इन्सेंक्ट ट्रॅप), ट्रॅक्टर चलित औजारे (रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर/विडर, पेरणी यंत्र), कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे. ( ५ एच पी सबमर्सिबल विदुत पंपसंच, डिझेल इंजिन) कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे (कडबाकुट्टी, ताडपत्री, मधुमक्षीका पेटी (२५%), स्लरी फिल्टर) सेंद्रीय शेती ५०% मर्यादित अनुदानावर उद्दढ तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करणेत आली. तसेच प्रतिक्षा यादी देखील तयार करणेत आली आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता



# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर देखील मूलभूत सुविधांपासून वंचित;अंतिम यात्रेची वाटही वेदनादायी

## सांगोला तालुक्यातील हतीद येथील धक्कादायक प्रकार दफनभूमीत जाण्यासाठी चक्क जावे लागते चार पाच फुट पाण्यातून




सांगोला : देशाच्या राजकारणात विविध माध्यमातून सांगोला तालुक्याचे नाव सर्वत्र होत असते मात्र याच सांगोला तालुक्यातील हतीद गावामध्ये मुस्लिम बांधव स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर देखील मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. या गावात नदीनाल्यातून ४ ते ५ फूट खोल पाण्यातून अंत्यविधी करण्यासाठी जावे लागले दफनभूमीत पोहचण्यासाठी इतका भयानक त्रास सहन करावा लागत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे विशेषतः हतीद गावातील ग्रामस्थांना स्मशानभूमीत जाण्यासाठी रस्ता नसल्याने नदी नाल्यातून मार्गस्थ व्हावे लागते. मुस्लिम समाजाचे हेळसांड कधी थांबणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मृत्यूनंतरही मरणयातना सोसाव्या लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तसेच या घटनेनंतरही प्रशासनाला जाग येणार येणार आहे का? असा संतप्त सवाल केला जात आहे.

हतीद येथे दफनभूमी बेलवन नदीच्या पश्चीमेस आहे. या नदीवर मागील काही वर्षापुर्वी बंधारा बांधण्याचे काम झाले आहे. त्यामुळे सहाजिकच त्याचे बॅकवॉटर या दफनभूमी असलेल्या बाजूला उलट प्रवाहित होत असल्याने त्याठीकानी पाण्याचा निचरा होत नाही परिणामी प्रेत नेताना विनाकारण त्रास सहन करावा लागतो. कधी कधी तर जास्त पाणी असल्यास ट्रॅक्टर मध्ये मृतदेह ठेवून जावे लागते. सर्व परिस्थिती पाहता या नदीवरून पलीकडे जाण्यासाठी शिडीवर्क करून मिळण्याची मागणी मुस्लिम समाजाकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा सुचना देऊन सुद्धा झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जाग येते नाही. हे दुर्दैव म्हणावे लागेल.

हतीद गावातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी नदीतून जीव धोक्यात घालून धोकादायक प्रवास करावा लागत आहे हा प्रवास नेते मंडळी संबंधित प्रशासन थांबवतील का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विविध विभागांच्या सन्मानपत्र व पुरस्कारांचे वितरण



सोलापूर :भारतीय स्वातंत्र्य दिना निमित मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ठीक नऊ वाजून पाच मिनिटांनी करण्यात आले.यावेळी शासनाच्या विविध विभागाचे पुरस्कार वितरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलिस अधिकारी कर्मचारी यांना त्यांचे क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेबाबत पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.पोलीस दलामध्ये उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवा बजावल्याबद्दल राष्ट्रपती पदक मिळाल्याबाबत सहायक पोलीस आयुक्त राजन माने, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून विशेष सेवा पदक मंजूर करण्यात आल्याबद्दल पोलीस उपअधिक्षक ग्रामीण संकेत देवळेकर, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून शौर्यपदक मंजूर करण्यात आल्याबद्दल माढा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरिक्षक माढा नेताजी बंडगर, नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये नेमणूकीस असताना नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकादेशीर कारवायांना परिणामकारक रित्या आळा घालून कर्तव्य बजावून विहित केलेल्या कालावधीत पूर्ण केल्याबद्दल पोलीस आयुक्त सोलापूर शहर कार्यालयाचे यंत्र संचालक (सफौ) संतोष देशपांडे, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून विशेष सेवा पदक मंजूर करण्यात आल्याबद्दल सोलापूर ग्रामीणचे बिनतारी संदेश विभागाचे पोलीस हवालदार औदुंबर टरले यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

मा.मुख्यमंत्री महोदयांचे महत्वकांक्षी कार्यक्रम १०० दिवसांची कार्यालयानी सुधारणा विशेष मोहिम पुणे विभागातून निवडण्यात आलेली उत्कृष्ट कार्यालये- उपविभागीय अधिकारी कार्यालय माळशिरस, श्रीमती विजया पांगारकर, उपविभागीय कार्यालयात तृतीय क्रमांक, तालुका वैद्यकीय अधिकारी माढा डॉक्टर अविनाश खांडेकर, तालुका वैद्यकीय अधिकारी गटात प्रथम क्रमांक, तालुका वैद्यकीय अधिकारी माळशिरस डॉ. प्रियंका शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, तालुका कृषी अधिकारी करमाळा देवराज चव्हाण तालुका कृषी अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, वनपरिक्षेत्र अधिकारी सोलापूर रोहितकुमार गांगर्डे वनपरिक्षेत्र अधिकारी गटात तृतीय क्रमांक, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना वैराग श्रीमती रेश्मा पठाण प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना गटात तृतीय क्रमांक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सोलापूर शहर पश्चिम दिपक ढेपे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात तृतीय क्रमांक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सोलापूर शहर पुर्व विजय खोमणे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात द्वितीय क्रमांक, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त तालुका लघु पशु सर्व चिकीत्सालय पंढरपूर तानाजी खांडेकर सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त लघु पशु सर्व विकीत्सालय गटात द्वितीय क्रमांक, उप अभियंता जलसंपदा उजनी कालवा उपविभाग क्र.१६ सोलापूर बाळासाहेब जाधव उप अभियंता जलसंपदा गटात प्रथम क्रमांक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मोडनिंब देवेंद्र कदम उपविभागीय उलसंधारण अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, सहा निबंधक (सहकारी संस्था) उत्तर सोलापूर दत्तात्रय भवर सहा. निबंधक (सहकारी संस्था) गटात तृतीय क्रमांक, उपकोषागार अधिकारी पंढरपूर विठ्ठल पाटील उपकोषागार अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, तालुका क्रिडा अधिकारी अक्कलकोट नदीम शेख तालुका क्रिडा अधिकारी गटात तृतीय क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय अकलुज डॉ. एम.एन. गुडे उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय गटात प्रथम क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर डॉ.महेश सुडके उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालय गटात द्वितीय क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय बार्शी डॉ.एस.ए.बोपलकर उपजिल्हा /ग्रामीण रुग्णालय गटात तृतीय क्रमांक, गट शिक्षण अधिकारी अक्कलकोट प्रशांत अरबळी गट शिक्षण अधिकारी गटात तृतीय क्रमांक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सोलापूर, सुनिल हुसे जिल्हा ग्रंथालय अधिकारी गटात.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव दलाच्या समादेशक डॉ.दिपाली काळे, केगाव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजयकुमार चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# सांगोला अर्बन बँकेच्या वर्धापनदिना निमित्त रक्तदान शिबीर व मंगळागौर स्पर्धा संपन्न

सांगोला : सांगोला अर्बन बँकेच्या २९ व्या वर्धापनदिनानिमीत्त सांगोला अर्बन बँक, रोटरी क्लब, सांगोला व इनरव्हील क्लब, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा. बँकेच्या मिरज रोड रेल्वे गेट जवळील मुख्य कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात रक्तदात्यांनी उत्साहात सहभाग घेऊन ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

तसेच रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी दु. १.०० वा. महिलांसाठी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे भव्य मंगळागौर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ६ महिला संघानी सहभाग घेतला होता. यामध्ये नारायणी ग्रूप, आटपाडी येथील सौ. शुभांगी सातारकर, सौ. प्रतिभा पोदार, सौ. आशा भिंगे, सौ. गौरी गुळभिते, सौ. माधुरी भिंगे, सौ. रुपाली भिंगे, सौ. रेखा माळी, सौ. शुभांगी देशपांडे, त्यांनतर कृष्णाई ग्रूप सांगोला येथील सौ. शोभा माळी, सौ. मिना खटके, सौ. अपर्णा वेदपाठक, सौ. नलिनी पंडीत, सौ. वैजयंती पतंगे, सौ. अंजली पतंगे, सौ. सुजाता दिवटे, व साई ग्रूप सांगोला येथील सौ. वर्षा देशपांडे, सौ. वैशाळी बेले, सौ. सुरेखा सपाटे, सौ. मंगल चौगुले, सौ. कल्याणी सपाटे, सौ. वंदना दिवटे, सौ. योती पतंगे, सौ. शमा नष्टे तसेच महाशक्ती ग्रूप, पंढरपूर येथील सौ. रेश्मा परदेशी, सौ. अश्विनी येले, सौ. अमृता कुलकर्णी, सौ. सिमा शेटे, सौ. अर्चना शेटे, सौ. राधिका ढोबळे, सौ. अक्षता जवजांळ, हिरकणी ग्रूप, आटपाडी येथील सौ. सारीका राऊत्त, सौ. रोहिणी कबीर, सौ. श्रुतिका बालटे, कु. प्रज्ञा प्रविण राऊत्त, कु. अद्विता कबीर आणि सप्तरंग ग्रूप, सांगोला येथील सौ. योती गुळमिरे, सौ. नुर बागवान, सौ. पल्लवी थोरात, सौ. अनुपमा गुळमिरे, सौ. श्वेत घोंगडे, सौ. सुप्रिया घाङगे या स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत परिक्षक म्हणून माजी मुख्याध्यापिका सौ. सुनिता कुलकर्णी व माजी शिक्षिका सौ.गिता सपाटे यांनी उत्कृष्ठ काम पाहिले. स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धेचे निकाल जाहिर करण्यात आले असून प्रथम क्रमांक महाशक्ती ग्रूप, पंढरपूर यांना स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रु. ५०००/ -, द्वितीय क्रमांक सप्तरंग ग्रूप, सांगोला यांना स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रु. ३०००/- व तृतीय क्रमांक साई ग्रूप, सांगोला यांना



स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रु. २०००/- देण्यात आले असून इतर सहभागी ग्रूपना स्मृती चिन्ह देण्यात आले. तसेच प्रेक्षकांमधील उपस्थित महिलांना लकी ड्रॅाद्वारे पैठणी साडी व आकर्षक बक्षीसे देण्यात आले.यावेळी सांगोला अर्बन बँकेचे संस्थापक चेअरमन डॉ. प्रभाकर माळी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सीए के. एस. माळी, व्हा. चेअरमन श्री. राजन चोथे, संचालक सर्वश्री शिवाजीराव गायकवाड, रामचंद्र जाधव, सुरेश माळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुभाष वेळापुरे, आनंद शिवगुंडे रोटरी क्लबचे श्री. विजय म्हेत्रे, अशोक गोडसे, इनरव्हील क्लबच्या सौ. सुजाता पाटील, सौ. प्रतिमा माळी, सौ. रत्नप्रभा माळी, उपस्थित होते.या स्पर्धा बँकेच्या संचालिका डॉ. संगिता पिसे व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सदस्या ॲड. चैत्रजा बनकर यांनी विशेष प्रयत्न करून यशस्वी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. वृशाली पाटील यांनी केले.